The South Asian Academic Research Chronicle ISSN 2454-1109
A Refereed Interdisciplinary Indexed International Open Access Monthly e-Journal
Vol 11.Issue1 & 2; Jan-Feb 2024

# संत साहित्य आणि मुल्याविचार

प्रा. रमेश बाबासाहेब रिंगणे
मराठी विभाग, कला व विज्ञान महाविद्यालय, शिवाजीनगर, गढी.

**प्रास्ताविक :** कविता हा मानवी भावानुभवाचा प्रथम आविष्कार आहे. माणसाच्या मनातील विचार, कृती, भावना यांचा सहज शब्दावेग म्हणजे कविता. माणसाचं पहिलं प्रकट होणं असतं कविता. हेच केवळ काव्य निर्मितीचे मूळ कारण आहे. हे सत्य असले तरीही, साहित्याच्या दृष्टिकोनातून पहात असताना, कवितेलाही काही एक मूल्यात्मकता असल्याचे लक्षात येते.

कविता हा वाङ्मय प्रकार अति प्राचीन असून, तो विविध अंगाने विकसित, प्रवाहित झालेला आहे. मराठी कविता तर याबाबतीत वेगवेगळ्या प्रवृतीना प्रवाहित करत आली आहे

**मराठी कविता : स्वरूप आणि वाटचाल -**

त्या त्या समाज जीवनाची वैशिष्ट्ये, त्या साहित्यातून प्रतिबिंबित होत असतात जीवनपद्धती, संस्कृती आणि व्यक्तिगत दृष्टिकोन अनुभवाला समृद्ध करत असतो म्हणून मूल्यात्मक अनुभव हे साहित्याचे तत्व असते. सर्व साहित्य प्रकारात ही प्रक्रिया होतच असते. तेव्हाच एक साहित्यिक कलाकृती आकाराला येते. कविता अशीच मूल्यात्म अनुभवाला शब्दबद्ध करते आणि एकूणच सर्व साहित्याचा मूलस्त्रोत काव्यात असल्याचेच दिसते. कारण कोणत्याही राजकीय, सामाजिक घडामोडींचे परावर्तन प्रथमता होते ते कवितेतूनच. मराठी कवितेची हीच पार्श्वभूमी आहे. इतर वाङ्मय प्रकारांच्या तुलनेत कविता या वाङ्मय प्रकाराला समृद्ध अशी प्राचीन परंपरा आहे.

मराठी कवितेची ही वाटचाल अभ्यासत असताना “समाज जसा प्रवाही आहे तसेच समाजात निर्माण होणारे साहित्यही प्रवाहीच असते. ज्या विरोध-विकास सिद्धांतानुसार समाज प्रवाहीत झालेला असतो, तोच सिद्धांत नव्या नव्या वैशिष्ट्यांचे साहित्य निर्माण व्हायला किंवा नव्या नव्या साहित्य प्रवाहांचा जन्म व्हायला कारणीभूत झालेला असतो. कारण साहित्यात अंतिमता मानवी मनाचे, जीवनाचे आणि समाजाचे प्रतिबिंब उमटत असते. म्हणूनच साहित्याचे स्वरूप प्रवाहीच असणार. वेळोवेळी समाजात नवे नवे साहित्य प्रवाह जन्माला येतच राहणार.”१ या आशयात्मक प्रवाहाच्या अंगानेच आपल्याला जावे लागेल, कारण मराठी कवितेत त्या त्या काळातल्या परिस्थितीचे संदर्भ आहेत. त्यानुसारच एका समान आशयला घेऊन, एक प्रवाह तयार होऊन मराठी कविता व्यापक होत आली आहे. आणि वाङ्मय इतिहासाने देखील मराठी कवितेचा प्रवास प्रवाहाच्या अंगानेच रेखाटला आहे.

संत काव्य, महानुभाव काव्य, पंडिती काव्य, शहरी काव्य आणि आधुनिक काव्य अशी अनेक विशेषांच्या बाबतीत वेगवेगळ्या प्रवाहात मराठी कविता वर्गीकृत झालेली दिसते. आधुनिक, सामाजिक कविता, गुढगुंजनपर कविता, क्रांतिकारी कविता, पौराणिक कविता, निसर्ग कविता, प्रेम कविता, अध्यात्मिक कविता, इ. निरनिराळ्या प्रवाहांना अधोरेखित करत करत मराठी कविता बहरतेच आहे.

**मध्ययुगीन मराठी कविता :** मराठी कवितेला समृद्ध असा प्राचीन वारसा लाभलेला आहे म्हणूनच प्र. न. जोशी ‘मराठी वांङ्मयाचा विवेचक इतिहास’ लिहिताना म्हणतात ‘परमार्थ, वेदांत, भक्ती, तत्त्वचर्चा

हेच विषय प्रामुख्याने या ग्रंथाचे होते. उच्च दर्जाचे परमार्थिक व आत्मसाक्षात्काराचे अनुभव स्फुट अशा अभंगातून प्रकटले. ज्ञानेश्वर, नामदेव, चोखोबा, एकनाथ व तुकाराम यांचे अभंग हे मराठीच्या कवितासृष्टीतील अमोल धन आहे. मराठी कवितेची मूळ अशी घट्ट रुजलेली आहेत. त्यायोगेच मराठी कविता बहरली, विस्तारली.

मुकुंदराज यांच्या 'विवेकसिंधू' पासून सुरू झालेला हा ग्रंथोत्सव अविरतपणे ज्ञानाची आणि तत्वांची मांडणी करतोच आहे. तत्कालीन परिस्थितीत उफाळलेल्या धर्म अवडंबरातून, कर्मकांड, वृत्तवैक्यल्यातून सुटका व्हावी आणि सर्वसामान्यांच्या सामाजिक, वैचारिक, धार्मिक भावनांची या माध्यमातून जागृती करण्यात प्राचीन काळातल्या मराठी कवितेने मोलाची भूमिका निभवली आहे या भूमिकेनेच महाराष्ट्राच्या मनोभूमीला पुढे परिपुष्ट केले आहे त्या जोरावरच महाराष्ट्र आज अनेक आघाड्यांवर अग्रेसर असल्याचे दिसते. मध्ययुगीन काळात सर्वसामान्य समाजाला ज्ञान देण्यासाठीच्या प्रेरणेतूनच अनेक पंथ, संप्रदाय उदयास आले. नाथ, जैन, सुफी, दत्त, वैष्णव, आदि संप्रदायाच्या ज्ञानात्मक उभारणीची पायाभरणी झाली. त्यांनीच मराठी बोलीभाषेतून विवेचनात्मक मांडणीद्वारे ग्रंथ निर्माण केले. या ग्रंथा आधारेच आपण कवितेच्या बाबतीत वेगवेगळे निष्कर्ष काढतो. कारण भाषा बोलणाऱ्यांची संस्कृती, परिस्थिती यांचा त्या भाषेतील ग्रंथाची फारच जवळचा संबंध असतो.

मराठी साहित्यात 'कविता' हे दालन प्रथमपासूनच शिरोभागी आहे. कालमान व जीवनाच्या गतिमानतेबरोबर परिस्थितीच्या संदर्भांना, बदलांना सामावून घेत मूल्यात्मकता जपण्यात मराठी कविता अग्रेसर आहे. आशय, विषय, रचना आणि रूपबंधात होणाऱ्या परावर्तनाला अंगीकारत मराठी कविता प्रवाही होत आली आहे. त्यामुळेच मराठी कवितेच्या आकलनात मध्ययुगीन मराठी कविता अधोरेखित करणे गरजेचे ठरते.

**संत कविता :** उत्तर भारतीय आर्य आणि दक्षिण भारतीय द्रविड यांच्या मधोमध मराठी भाषिकांचा प्रदेश आहे. या दोन्ही संस्कृतीत समन्वय साधत अखंड भारताचा संयोग घडवण्यात महाराष्ट्राचे, मराठी भाषेचे योगदान कोणी नाकारणार नाही. याचे सारे श्रेय द्यावे लागते ते संताच्या विचारधारेला आणि संतांच्या कवितेला "प्राचीन मराठी साहित्यात संत साहित्याची परंपरा हीच मध्यवर्ती व महत्त्वाची परंपरा परंपरा आहे. हे आज जवळजवळ सर्व मान्य झाले आहे. प्राचीन काळात समाजाच्या सर्व स्तरापर्यंत पोहोचून मराठी मनावर आपला ठसा उमटवणारी आणि त्याद्वारे प्रतिष्ठा प्राप्त करून घेणारी केवळ लोकाश्रयी अशी ही परंपरा आहे. या परंपरेनेच खरा कवी धर्म मराठी कवितेत प्रकट केला आहे." २ धर्मज्ञान प्राप्त करणे ही केवळ उच्च वर्णीयांचीच मक्तेदारी नाही तर सर्वासामन्यांचा हक्क आहे. अशी रोखठोक भूमिका संतांनी भारतीय तत्वज्ञानाच्या बाबतीत मांडली आणि संबंध मराठी जनांना अभंग, ओवीद्वारे

इये मराठीचिये नगरी ।
ब्रह्म विद्येचा सुकाळू करी ।।

हा नवा अभिनवेश प्राप्त करून दिला. म्हणूनच गेली सातशे, आठशे वर्ष संताची कविता मराठी जनांच्या मनामनात घर करून आहे.

माझा मराठीची बोलू कौतुके ।
परि आमृतातेही पैजा जिंके ।। (संत ज्ञानेश्वर)

या विचारसरणीवरच मराठी कविता परीपुष्ठ झाली आहे. "शतकानुशतके माणुसकीला पारखा झालेल्या सामान्य जनतेला मानवतेच्या प्रेमानुभूतीने सहज साध्य झालेला आत्मोध्दाराचा नवा मार्ग ज्ञानदेवांनी उपलब्ध करून दिला."३ अशाप्रकारे ज्ञानेश्वरांनी वारकरी संप्रदायाची महाराष्ट्रात पायाभरणी केली आणि सर्वांना भागवत धर्माच्या झेंड्याखाली एकत्र आणून सर्वप्रथम चंद्रभागेच्या वाळवंटात सर्व जाती धर्मांना प्रतिनिधित्व देऊन आध्यात्मिक, सांस्कृतिक लोकशाहीचा सोहळा भरवला.

दुरीतांचे तिमीर जावो । जो जे वांच्छील । तो ते लाहो । प्राणीजात ।।

सर्वांच्या, जगाच्या कल्याणाचे, मानवतेवर आधारित पसायदान ज्ञानेश्वरांनी गायले. भक्तिमार्गाची स्थापना करून एका नव्या युगाचा आरंभ केला. ज्या धर्म साधनेला मध्ययुगात संत ज्ञानेश्वरांनी नवा मार्ग दाखवला त्या मार्गाचे नेतृत्व संत नामदेवांनी केले.

प्रेम सर्वांगाचे ठायी । वाचे विठ्ठल रखुमाई ।
नाचू कीर्तनाचे रंगी । ज्ञानदीप लावू जगी ।। (संत नामदेव)

ही ज्ञानदीपाची पताका पंजाब पर्यंत फडकवली ती संत नामदेवांनी. स.रा. गाडगीळ संत नामदेवांच्या बाबतीत म्हणतात की, 'कर्मकांड, वृत्तवैकल्य यांच्या जंजाळातून मुक्त करून सर्व अज्ञ समाजाला अध्यात्मिक, सांस्कृतिक आत्मोन्नती करून घेण्याचे सहज सुलभ असे साधन दिले.' संत नामदेवांनी वारकरी संप्रदाय आणि मराठी कवितेच्या सीमा विस्तारित नेल्या, त्या थेट शीख धर्म ग्रंथापर्यंत. याचआधारे धर्म साधनेचा पहिला कीर्तनकार म्हणून संत नामदेवांचा उल्लेख केला जातो.

सोळाव्या शतकात धर्मग्लानीच्या काळात आलेल्या सांस्कृतिक आवर्तनाची कोंडी फोडून आपला धर्म, भाषा, वांड्मय याबद्दल लोकांना आत्मीयता वाटू लागते ती संत एकनाथांमुळे. नाथांनी महाराष्ट्राला भक्ती मार्गाला दिलेली सर्वात मोठी देणगी म्हणजे प्रपंच आणि परमार्थ यांचा समन्वय ही होय. त्यांनी लोक तत्वांचा आधार घेत भक्ती मार्गाचे पुनरुज्जीवन करण्याचा प्रयत्न केला. डॉ. अशोक देशमाने म्हणतात "पैठणला सनातन्यांच्या गराड्यात राहुन मोगली आक्रमण काळात समाजाला स्थैर्य देण्याचे कार्य नाथांनी केले."४ एक प्रकारे एकनाथ ते लोकनाथ असाच प्रवास त्यांच्या काव्याने, ग्रंथाने व तत्त्वज्ञानाने केल्याचे दिसते.

बुडता हे जन । देखवेणा डोळा ।
म्हणोनि कळवळा । येतसे ।। ( संत तुकाराम)

अशी भूमिका ज्याच्या जीवनदृष्टीतून प्रत्ययास येते ते संत तुकाराम प्राचीन मराठी कवितेतील अत्यंत महत्वाचे नाव. त्यांनी मराठी कविता लोकाभिमुख करण्याचा प्रयत्न केला. सामाजिक अधःपतनाच्या मुळावरच संत तुकारामांनी घाव घातला. 'यारे यारे लहान थोर । यातिं भलती नारी नर' अशी नवी मांडणी करून, वेदांचा तो अर्थ आम्हासीच ठावा । येरांनी वाहवा भार माथा।। असा सज्जड दम देणारी रचना त्यांनी निर्माण केली, म्हणूनच मराठी कविता संत तुकारामांनी देवघरातून मुखामुखात उतरवली आणि हेच सर्व समाज घटकांमधील सर्व पातळ्यावरील सर्व व्यापक बंड घडवून आणले.

वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे । पक्षीही सुस्वरे आळविती ।। या संत तुकारामांच्या ओळी पर्यावरणाच्या दृष्टिकोनातून सुद्धा काल सुसंगत ठरताना दिसतात तुकारामांच्या कवितेचा, अभंगाचा आजही वेगवेगळ्या जाणिवांच्या माध्यमातून अभ्यास केला जात आहे. खऱ्या अर्थाने हेच संताच्या कवितेचे सामर्थ्य आहे. प्रेम, दया, करुणा ही मानवतावादी मूल्य तुकारामांच्या अभंगाची मूलतत्वे आहेत एक प्रकारे मराठी कवितेत तुकारामांनी नव्या जाणिवेचा वेध घेतला.

संत नामदेव, संत एकनाथ, संत तुकाराम, समर्थ रामदास, मुक्ताई, जनाबाई, बहिणाबाई, ई, संत मंडळीची अभंग कविता आजही अजरामर आहे. या सर्वांच्या मध्ये पंढरीच्या विठ्ठलाच्या माध्यमातून जो एक्तात्वाचा धागा आला, तो समतेचा आहे. तत्कालीन परिस्थितीत हे फार मोठे बंड होते. त्याच्या प्रसारासाठी संतांनी अनेक माध्यमे हाताळली व कविता जन मनाच्या ओठावर खेळती ठेवण्याचा प्रयत्न केला. संत सावता माळी, संत नरहरी सोनार, निळोबा, इत्यादी अशा अनेक संत मंडळींनी आपले भावानुभव मराठी कवितेतून बोलते केले स्वतःच्या मनाची घालमेलही त्यांनी या माध्यमातून अभीव्यक्त केली. उच्च-नीचता, वर्णभेद, इत्यादी मधील विसंगती, अवास्तवता त्यांनी समाजासमोर मांडली. "अशी ही संत चळवळ सामाजिक लक्षापासून लोकांना परावृत्त करणारी प्रतिगामी शक्ती नसून, धार्मिक जीवनाच्या कक्षेत त्यांच्या हक्कासाठी सनदशीरपणे झगडणारी सुधारणावादी प्रवृत्तीच होती"५ याच काव्यप्रवृत्ती, प्रवाहाचे वर्णन संत बहिणाबाई यांनी आपल्या 'संतकृपा झाली' या अभंगामधून मांडलेले आहे.

धार्मिक अधःपतनाच्या काळात संताची कविता बहरली, विस्तारली. सामाजिक, राजकीय, धार्मिक, आर्थिक अशा दुरावास्थेच्या काळात, प्रतिकूल वातावरणात अज्ञ, अडाणी सामाजिक मानसिकतेत नैतिक, वैचारिक, वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करण्यात अनेक चळवळींना मध्ययुगीन मराठी कवितेने शाब्दिक पाठबळ दिले आहे.

संताची हीच शिकवण, त्यांचा आत्मोद्धाराचा, समाज उद्धाराचा समग्र मुल्याविचार विचार आजही उपयुक्त ठरतो आहे. त्यामुळेच वारकरी संप्रदाय महाराष्ट्राच्या घराघरात पोहोचला आणि सर्वांच्या मनामनात मानवतेचे बीज पेरू शकला.

**संदर्भ**

१- आनंद यादव, सामाजिक स्थिती आणि साहित्यातील नवे प्रवाह, पब्लिशिंग हाऊस पुणे, मार्च २००१, पृष्ठ क्रमांक ५
२- ग. बा. सरदार, संत वाङ्मयाची सामाजिक फलश्रुती, लोक वाङ्मय ग्रह, डिसेंबर २००६, प्रस्तावना
३- स.रा. गाडगीळ, मराठी काव्याचे मानदंड, खंड पहिला, पद्मगंधा प्रकाशन, पृष्ठ क्रमांक ३२
४- प्रल्हाद लुलेकर, मराठवाड्यातील साहित्य
५- रामकली पावसकर, मराठी कविता प्रवृत्ती आणि प्रवाह, स्वरूप प्रकाशन औरंगाबाद पृष्ठ क्रमांक ३